**MHKO100000672022**

## आदेश निशाणी क्र. २७

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांना दावेस कैफीयत देणेकरीता आवश्यक ती कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने कैफीयत मुदतीत देता आली नाही. प्रतिवादी यांनी जाणुनबुजून दावेस कैफीयत व मनाई अर्जावर म्हणणे सादर केले नाही असे घडलेले नाही. प्रतिवादी यांना दावेस कैफीयत व म्हणणे सादर करणेस १ वर्ष ३ महिने ५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांना कैफीयत मांडणेची संधी न मिळालेस प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडता येणार नाही. प्रतिवादी यांना संधी मिळालेस वादी यांचेवर कोणताही अन्याय होणार नाही. उलट दावा गुणदोषावर चालणेस व न्यायनिवाडा करणे सोपे होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील मजकुर चुकीचा आहे. प्रतिवादी यांना सर्व कागदपत्रे पोहोच झालेली आहेत. असे असताना प्रतिवादी यांनी जाणुनबुजून मुदतीत आपली कैफीयत दाखल केलेली नाही. अर्जामध्ये विलंबाबतची कारणे चुकीची आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा असे कळविले आहे. तसेच अर्ज मंजूर करावयाचा झालेस प्रतिवादी यांचेवर रक्कम रुपये ५०००/- खर्च बसविणेत यावा असे कळविले आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांचे विरुध्द दिनांक २७/०७/२०२२ रोजी विना कैफीयत आदेश पारीत करणेत आलेला आहे. त्यांनंतर प्रस्तुत प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २७/०६/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रकरणात वादी यांनी आपले पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही. तसेच प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर काहीअंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१)** प्रतिवादी यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

DHANASHRI MAHADEV PAWAR

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.07.26 16:35:55 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २५/०७/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज